<u>शासकीय कर्मचाऱ्यांने सेवा निवृत्तीच्या वेळी स्थायी पद/स्थायित्व प्रमाणपत्र धारण केलेले असण्यासंबंधीची अट...</u>

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांकः सेनिवे १००१/३३८/सेवा-४
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२. दिनांकः २ जून २००३

<u>निर्णय</u>

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम-३० च्या तरतूदीनुसार शासकीय कर्मचाऱ्याची अर्हताकारी सेवा, त्याची ज्या पदावर कायमपणे किंवा स्थानापन्न किंवा तात्पुरती या नात्याने प्रथमतः नेमणूक केलेली असेल, त्या पदाचा कार्यभार तो ज्या तारखेस घेईल त्या तारखेपासून सुरु होईल. मात्र सेवानिवृत्तीच्या वेळी सदरहू शासकीय कर्मचाऱ्याने शासकीय सेवेतील एखादे स्थायी पद कायमपणे धारण केलेले असले पाहिजे अथवा निलंबित धारणाधिकार किंवा स्थायित्व प्रमाणपत्र धारण केलेले असले पाहिजे.

२. शासन आता असा निदेश देत आहे की, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ च्या नियम-३० मधील, ***<u>"सेवानिवृत्तीच्या वेळी शासकीय कर्मचाऱ्याने शासकीय सेवेतील एखादे स्थायी पद कायमपणे धारण केलेले असले पाहिजे अथवा निलंबित धारणाधिकार किंवा स्थायित्व प्रमाणपत्र धारण केलेले असले पाहिजे"- ही तरतूद वगळण्यात येत आहे</u>***.

३. हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील व या दिनांकाला जे शासकीय कर्मचारी सेवेत आहेत/होते त्यांना लागू होतील.

४. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ३० च्या विद्यमान तरतूदी, या शासन निर्णयातील तरतूदींच्या मर्यादेपर्यन्त सुधारण्यात आल्या आहेत असे मानण्यात येईल. या नियमात रितसर सुधारणा यथावकाश करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ.कु.दौ. जाधव
शासनाचे प्रधान सचिव

प्रति,

◆भारत सरकारचे सचिव,वित्त मंत्रालय, नवी दिल्ली,
◆महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१२५ प्रती),
◆महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१२५ प्रती),
◆महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
◆महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),
◆मुख्य लेखा अधिकारी, बी ब्लॉक, दिल्ली प्रशासन, विकास भवन, नवी दिल्ली (५ प्रती),
◆नियंत्रक, लेखा, परराष्ट्र मंत्रालय, नवी दिल्ली (१० प्रती),
◆ संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
◆अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (२५ प्रती),
◆मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
◆उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १० प्रती),
◆वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
◆निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
◆ सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
◆राज्यपालांचे सचिव,
◆मुख्य मंत्र्यांचे सचिव,
◆उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
◆ सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
◆*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
◆*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
◆*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
◆*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
◆*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
◆*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण कुटीर क्र.३ व ४, अधिदान व लेखा कार्यालय आवार, मंत्रालयासमोर, मुंबई,
◆मंत्रालयातील सर्व विभाग,
◆विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
◆मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
◆ सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
◆ सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
◆ सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष (प्रत्येकी ५ प्रती),
◆ सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
◆शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
◆ तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
◆ संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),
◆ सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
◆ सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
◆शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,
◆ सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),
◆ सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),
◆ सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
◆कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),
◆कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ , परभणी (१० प्रती),
◆कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),
◆कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),
◆ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (१२ प्रती),
◆शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
◆उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
◆कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),
◆वित्त विभागातील सर्व कार्यासने,
◆निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

*पत्राद्वारे.